शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय/महोदया,

विद्यापीठ व महाविद्यालयातील १८-१९ वयोगटातील विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी प्राधान्याने करणेबाबतचे डॉ. दिपक म्हैसेकर, विभागीय आयुक्त कार्यालय, विधान भवन, पुणे यांचे संदर्भ क्र. शा.प्र.क्र./निवड/कावि/ ४२९/१ दि.२५/०९/२०१८ चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

कळावे,

आदेशान्वये

उपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ 130

दि. 28 SEP 2018

d:\mangutkar\circular.docx

डॉ. दिपक म्हैसेकर भा.प्र.से.
विभागीय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

विभागीय आयुक्त कार्यालय,
विधान भवन, पुणे - ४११ ००१.
दूरध्वनी : (का.) २६३६२२२३

दिनांक/शा.प.क्र./निवड/कावि/ ८२८/२०१
२५/९/२०१८

विषय :- विद्यापीठ व महाविद्यालयातील १८-१९ वयोगटातील विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी प्राधान्याने करणेबाबत.

आदरणीय सर,

मा.मुख्य निवडणुक अधिकारी, मुंबई यांचेकडील पत्र क्र.ईएलआर२०१८/प्रक्र५७०/१८/३३ दि.३१ ऑगस्ट,२०१८ अन्वये १/१/२०१९ या अर्हता दिनांकावर आधारीत छायाचित्र मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनर्रिक्षण कार्यक्रम पुणे विभागात सुरु आहे. या कार्यक्रमाअंतर्गत मी, 'मतदार यादी निरीक्षक' (Observer) म्हणून पुणे विभागातील पुणे,सातारा व सांगली जिल्हयांना भेटी दिल्या असता १८-१९ वर्षे वयोगटातील नविन मतदारांची नोंदणी विहीत प्रमाणापेक्षा खूपच अल्प प्रमाणात झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

मा.भारत निवडणुक आयोगाचे निर्देशानुसार १८ वर्षे पुर्ण झालेल्या मतदारांची नोंदणी मोठया प्रमाणावर होणेच्या दृष्टीकोनातून आपले विद्यापीठ व अधिनस्त सर्व महाविद्यालयातील १८ वर्षे झालेल्या सर्व विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी १००% होईल यासाठी प्राधान्याने मोहीम स्तरावरुन कार्यवाही करावी ही विनंती.

पुणे विभागातील प्रत्येक जिल्हयात विधानसभा मतदार संघनिहाय उपजिल्हाधिकारी दर्जाचे मतदार नोंदणी अधिकारी (ERO) कार्यरत आहेत जिल्हाधिकारी कार्यालयास नविन मतदार नोंदणीसाठी विद्यापीठ व महाविद्यालयाचे यंत्रणा यांना नविन मतदार नोंदणीसाठीचे फॉर्म नं. ६ उपलब्ध करुन देणेच्या व सर्व आवश्यक ते सहकार्य करणेच्या सुचना यापूर्वीच देणेत आल्या आहेत. तरी त्यांचेकडून फॉर्म नं. ६ उपलब्ध करुन घेण्याबाबत आपले कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांना आपले स्तरावरुन सुचना देवून १८ वर्षे पुर्ण केलेल्या मुलामुलींची मतदार नोंदणी १००% पुर्ण करणेकरीता २ ऑक्टो २०१८ रोजीच्या महात्मा गांधी यांचे जयंती दिनाचे औचित्य साधुन त्या दिवशी विशेष मोहीम सुरु करणेत यावी व १८ वर्षे पुर्ण झालेल्या मुलामूलींकडून मतदार नोदंणीचा फॉर्म नं.६ भरुन घेणेत यावा. सदर फॉर्म सोबत वयाचा व रहिवासाचा पुरावा प्राप्त करुन संपूर्ण अर्ज संबधित ERO / AERO, उपजिल्हाधिकारी / तहसिलदार यांचेकडे जमा करणेबाबत सर्व महाविद्यालयांना सुचना द्याव्यात.

कृपया सदरचा कार्यक्रम यशस्वी करणेसाठी योग्य ते नियोजन करुन घेण्याबाबत महाविद्यालयांना आपले स्तरावरुन सुचना देणेत याव्यात. विनंती,

लोकशाही सदृढ करण्यासाठी आपले सहकार्य व योगदान अंत्यत मोलाचे व उपयुक्त ठरणार आहे. तरी कृपया सहकार्य करावे ही विनंती.

आदरपूर्वक

आपला विश्वासू
दिपक म्हैसेकर
(डॉ.दिपक म्हैसेकर)

मा.श्री.डी.बी.शिंदे
कुलगुरु
शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर